# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

## अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र

प्रति, ऑर्कीड सिटी इंटरनॅशनल स्कूल
नवसरी ते वालगाव रोड,अमरावती

नं. AMMC/FIRE-NOC/0031/24-25
कार्यालय अग्निशमन विभाग
जा.क्र.अ.म.न.पा/अग्नि.वि./0031/२०२४
दिनांक : 07/06/2024

संदर्भ :- (१) ना-हरकत मिळविण्याकरिता आपला प्राप्त अर्ज दि. 07/06/2024
(२) श्री.इंजिनियरिंग,नागपूर या प्राधिकृत अभिकर्ता द्वारा प्राप्त फायर सेफ्टी ऑडिट रिपोर्ट दि. 04/06/2024

### ना - हरकत प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / सौ. सौ.वर्षा अशोक राठोड

यांनी संदर्भ १ चे विनंती अर्जानुसार व संदर्भ २ चे शासन प्राधिकृत अभिकर्ता / संस्थेद्वारे अग्निसुरक्षा ऑडिट करून Educational Insititte या व्यवसायासाठी अग्निशमन विभाग म.न.पा. अमरावती यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची मागणी केली आहे. तसेच दि. 07/06/2024 ला तांत्रिक तपासणी अग्निशमन अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांनी केली. त्यानुसार खालील नियम व अटी शर्तींच्या आधीन राहून आपणास ना - हरकत प्रदान करण्यात येते.

१) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक अधिनियम २००६ चे भाग ४ व २००९ चे भाग ४ (ब) तसेच २०२३ चे सुधारित अधिनियम अन्वये आपणास आगप्रतिबंधक उपाय योजना व यंत्रणा यामधीन तरतुदीचे अनुपालन करावे लागेल व NBC २०१६ मधील नियमांची पूर्तता करण्यात यावी तसेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय व अमरावती महानगर पालिकेने वेळोवेळी सुधारणा केलेले नियम व त्यामधील बदल आपल्यावर बंधनकारक राहील.
२) इमारतीचे Fire Safety Audit नुसार संपूर्ण अग्निसुरक्षा व्यवस्था करावी लागेल. आवश्यक त्या ठिकाणी धुम्रपान निषेध फलक लावावे लागेल व महत्वाचे दूरध्वनी क्रमांक उदा, पोलिस नियंत्रण कक्ष अग्निशमन दल, अँब्युलन्स इ. चा फलक दर्शनिय ठिकाणी लावावे लागेल.
३) अग्निसुरक्षा व्यवस्थेचे परिक्षण, मा. संचालक अग्निशमन सेवा, मुंबई यांनी नोंदणीकृत केलेले अनुज्ञाप्तीधारक अभिकरणांकडून जानेवारी व जुलै असे वर्षातून दोन वेळा अर्जदाराने स्वतःहून करुन घेणे बंधनकारक राहील.
४) आपल्या सर्व कर्मचारी वर्गास अग्निरोधक उपकरणाची वेळोवेळी माहिती देण्यात यावी व सराव घेण्यात यावा.
५) आग प्रतिबंधक उपाय योजना नेहमीसाठी कार्यान्वित रहावी याची दक्षता घ्यावी. सर्व विद्युत उपकरणे वेळोवेळी तांत्रिक तंत्रज्ञाकडून तपासून घ्यावेत.
६) आग प्रतिबंधक उपाययोजना बाबत लावलेल्या अग्निशमन उपकरणाची पाहणी अग्निशमन दल मार्फत केव्हाही करण्यात येईन त्याकरिता आपली हरकत राहणार नाही. अग्निशमन ना-हरकतप्रमाणपत्र सोबत आवश्यक असल्यास इतर विभागाचे आवश्यक ते परवाने आपल्या स्तरावर प्राप्त करून घ्यावे.
७) नाहरकत प्रमाणपत्राची वैधता १ वर्षाची राहील.
८) वरील अधिनियमाप्रमाणे व्यवस्थेअभावी आगीची कोणतीही घटना घडल्यास व त्यामध्ये जिवित व वित्त हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी व्यवस्थापनाची (अर्जदार) यांची राहील.
९) दरवर्षी नियमानुसार नुतनीकरण शुल्क भरून अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे अर्जदारास बंधनकारक राहील.
१०) सदर अधिनियमामधील कोणत्याही तरतुदीन्वये काढलेल्या आदेशाची, नोटीसची किंवा निर्देशाचे उल्लंघन केल्यास किंवा अनुपालन करण्यात कसूर केल्यास संबंधित प्रकरणी अधिनियम मधील कलम ७, ८, ३६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.
११) अग्निशमन ना-हरकत प्रमाणपत्र हे केवळ अग्निशमन यंत्रणेकरिता मर्यादित राहील याचा इमारत (निवासी, वाणिज्य) बांधकाम संदर्भात कुठलाही संबंध राहणार नाही.
१२)वरील बाबींची पूर्तता न झाल्यास आपले ना-हरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

उपरोक्त प्रमाणपत्र हे दि. 06/06/2025 पर्यंत वैध राहील

टीप : १) अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण दरवर्षी करणे अनिवार्य आहे.
२) शासन नियमानुसार जानेवारी आणि जुलै महिन्यात फॉर्म बी सादर करणे अनिवार्य आहे

आयुक्त/उपायुक्त/मुख्य अग्निशमन अधिकारी/अग्नि अधिक्षक
अमरावती महानगरपालिका, अमरावती